Sakal Amt. Dt. 08-01-2021 Pg. No.3

# राम मेघे इन्स्टिट्यूटचे ५८५ विद्यार्थी नामांकित कंपनीत

## प्लेसमेंटला प्रतिसाद; अभियंत्यांना मिळाले उत्तम पॅकेज

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. ७ : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च महाविद्यालयाच्या ५८५ विद्यार्थ्यांची निवड नामांकित कंपन्यांमध्ये झाली. या अभियंत्यांना उत्तम पॅकेज मिळाले आहे. विशेष म्हणजे, कोविड-१९ तसेच आर्थिक मंदीच्या छायेतसुद्धा या विद्यार्थ्यांना उत्तम नोकऱ्या मिळाल्या.

लॉकडाउनच्या काळात या महाविद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांची बाईजूस कंपनीत १० लाख रुपयांच्या पॅकेजवर नियुक्ती झाली. महाविद्यालयातून उत्तीर्ण झाल्यावर एका उत्तम नोकरीचे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते. त्यामुळे या महाविद्यालयाच्या वतीने सातत्याने प्लेसमेंट प्रक्रियेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक उत्तम संधी दिली जाते. ट्रेनिंग तसेच प्लेसमेंट विभाग त्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतो. विद्यार्थ्यांनी आपली मेहनत, जिद्द, चिकाटी तसेच चांगल्या तयारीच्या जोरावर हे यश संपादित केले आहे.

प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च महाविद्यालयाच्या वतीने केवळ पुस्तकी ज्ञानापर्यंतच मर्यादित न राहता या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण करावी, यादृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. त्यामुळेच या संस्थेने आजवर २० हजारांवर अभियंते तयार केले असून हे सर्व अभियंते विविध क्षेत्रांत उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यांचा महाविद्यालयाशी नेहमीच संपर्क राहत असल्यानेच शिक्षणक्षेत्र व उद्योग यातील अंतर कमी करण्यात मदत झाली आहे.

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास तसेच स्पर्धेच्या या युगात विद्यार्थी टिकला पाहिजे यादृष्टीने त्यांना विविध माध्यमांतून सर्वांगीण ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. २०१८-१९ मध्ये ५०३ तर २०१९-२० मध्ये तब्बल ५८५ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या नोकरीची संधी मिळाली आहे, असे ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे प्रमुख डॉ. निक्कू खालसा यांनी सांगितले.

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, शंकरराव काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. वैशाली झांडे, डॉ. पूनम चौधरी तसेच प्राचार्य डॉ. अमोल बोडखे यांच्या मेहनतीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

Central Library PRMIT & R., Badnera

Tarun Bharat Dt. 08-01-2021 Pg. No.3

# राम मेघे इन्स्टिट्यूटच्या ५८५ विद्यार्थ्यांची निवड

## नामांकित कंपन्यांमध्ये मिळाला रोजगार

◆ **अमरावती, ७ जानेवारी**

स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीद्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ॲण्ड रिसर्च बडनेरा येथील ५८५ विद्यार्थ्यांची नामांकीत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. एकीकडे कोविड-१९ आणि आर्थिक मंदी असताना शैक्षणिक सत्र २०१९- २० सत्रात इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड होणारे प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ॲण्ड रिसर्च, हे अमरावती विभागातले एकमेव महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांची नियुक्ती टाटा कंसलटेंसी सर्विसेस, बाईजूस, आईबीएम, विप्रो, कॉग्निजेंट, कॅप जैमिनी, ऐमेजॉन, डी मार्ट, जस्ट डायल, धूत ट्रांसमिशन, नेटवर्थ रिसर्च अशा राष्ट्रीय तथा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाल्याने उत्साहाचे वातावरण आहे.

टाळेबंदीतही महाविद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांची बाईजूस कंपनीत १० लाखांच्या पॅकेजवर नियुक्ती झाली आहे. महाविद्यालयातून उत्तीर्ण होते वेळी एक सुरक्षित नोकरी मिळायला हवी, असे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील राहते. विविध कंपन्यांच्या माध्यमातून महाविद्यालय नियमीत रोजगार मेळावे घेते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना विविध प्रशिक्षण दिल्या जाते. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम व योग्य तयारी करून हे यश मिळविले आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल बोडखे यांनी सांगितले.

विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीने स्थापनेपासून शिक्षणाची गंगा प्रत्येक घरात पोहोचविण्याचे कार्य केले आहे. प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूटने आतापर्यंत २० हजार अभियंते घडविले आहे. ते उच्चपदावर विविध क्षेत्रांत कार्यरत आहे.



प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. निक्कू खालसा माहिती देताना म्हणाले, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ज्ञान दिले जाते. शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातून ५०३ आणि २०१९-२० मध्ये ५८५ विद्यार्थ्यांची नियुक्ती नामांकीत कंपन्यांमध्ये झाली. प्रा. श्रीकांत देशमुख (प्लेसमेन्ट ऑफिसर) व डॉ प्रांजली देशमुख (ट्रेनिंग ऑफिसर) यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निरंतर प्रशिक्षण दिले जाते.

नियुक्तीसाठी समन्वय ठेवणाऱ्या प्रा. संग्राम दांडगे, प्रा. रवी हिरुळकर, प्रा. स्मित ठाकूर, प्रा. अनुप बुरंगे, प्रा. आनंद चौधरी, प्रा. ऋचा कोल्हेकर, डॉ. निनाद गावंडे, प्रा. नुंपूर यावले, प्रा. नीलेश वाढे, प्रा. अनूप कडू, प्रा. हर्षवर्धन निस्ताने, प्रा. अंकुर महल्ले, प्रा अंकुर साखरे, प्रा. अजय किन्हीकर, डॉ नेहा ढोले, प्रा. पल्लवी ताजने, प्रा. युवराज वैद्य, प्रा. रुचिता काळे, प्रा. सलेहा सौदागर, प्रशांत हिवसे, विशाल श्रीवास, श्रीकांत बोके या विभाग प्रमुखांचेही अभिनंदन होत आहे. विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारी सदस्य शंकरराव काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिनी देशमुख, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पूनम चौधरी व प्राचार्य डॉ. अमोल बोडखे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Central Library PRMIT & R., Badnera

Matrubhumi Dt. 08-01-2021 Pg. No.8

# राम मेघे इंस्टीट्यूटमधील 585 विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

## 10 लाख, सरासरी 3.5 लाखाचे पॅकेज



**प्रतिनिधी/७ जानेवारी**

**अमरावती-** येथील विदर्भ यूथ समाजकल्याण संस्थेव्दारे संचालित बडनेरा येथील तंत्रज्ञान व संशोधन प्रा. राम मेघे इंस्टिट्यूटमधील 585 विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली. एकीकडे विश्वात कोविड-19 व आर्थिक मंदी असतांनाही शैक्षणिक सत्र 2019-20 मध्ये इतक्या विद्यार्थ्यांची निवड करणारे विभागातील तंत्रज्ञान व संशोधन प्रा. राम मेघे इंस्टीट्यूट एकमेव महाविद्यालय बनले आहे. विद्यार्थ्यांची निवड टाटा कन्सल्टंसी सर्विसेस, बायजूस, आयबीएम, विप्रो, कॉग्निजेंट, कॅप जॅमिनी, ॲमेझॉन, डी मार्ट, जस्ट डायल, धूत ट्रांसमिशन, नेटवर्थ रिसर्च सारख्या राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आहे. लॉकडाउनमध्येही महाविद्या लयातील 18 विद्या र्थ्यांची बायजूस कंपनीत 10 लक्षाच्या पॅकेजसह निवड झाली आहे. महाविद्यालयातून उत्तीर्ण होतांना एक नोकरी असण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थ्याचे होते. स्वप्न पूर्ण करण्याकरीता महाविद्यालय सतत प्रयत्नशिल राहून 20 कंपन्यांच्या माध्यमातून पूेसमेंट प्रक्रिया आयोजित करते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता विविध उपक्रम प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाव्दारे आयोजित करण्यात येते. महाविद्यालयाव्दारे सतत देण्यात येणारे विद्यार्थी केंद्रित कार्यक्रमांमध्ये कार्यशाळा, व्याख्यान समाविष्ट आहे. विद्यार्थ्यांनी आपली जिद्द, कठोर परिश्रम व योग्य तयारीने हे यश मिळविले आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल बोडखेंनी सांगितले. महाविद्यालया व्दारे विद्या र्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता सतत कार्य करीत राहण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरीता शुभेच्छा दिल्या व जुनियर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता सांगितले.

विदर्भ युथ समाजकल्याण संस्थेने स्थापनेपासून आजपर्यंत शिक्षणाची गंगा प्रत्येक घरात पोहचविण्याचे कार्य केले आहे. स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी आपली निराळी ओळख बनविण्याकरीता संस्था सदैव तत्परतेने कार्य करीत आहे. मध्यभारतातील अग्रणी संस्थांमध्ये प्रचलित बडनेरा येथील प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेने पुस्तकी ज्ञानाशिवाय व्यवहारीक ज्ञानातून 20 हजार अभियंत्यांचे निर्माण केले आहे. हे सर्व अभियंता उद्योगजगतात विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहे. त्यांचा महाविद्यालयाशी सतत संपर्क असतो. यात उद्योग जगत व शिक्षण क्षेत्रातील विभाजन कमी करण्यात महाविद्यालय यशस्वीपणे कार्य करीत आहे. कार्यक्रमात अधिक माहिती देत प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे डिन डॉ. निक्कू खालसा यांनी सांगितले की, व्यक्तित्व विकासाकरीता व स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरीता गरजेचे ज्ञान महाविद्यालयाव्दारे विद्यार्थ्यांना निरनिराळ्या माध्यमांव्दारे देण्यात येते. शैक्षणिक सत्र 2018-19 मध्ये महाविद्यालयातील 503 व 2019-20 मध्ये 585 विद्यार्थ्यांची निवड नामांकित कंपन्यांमध्ये झाली आहे. वर्षाच्या सुरूवातीलाच 150 विद्यार्थ्यांची निवड सातव्या सेमिस्टरमध्ये झाली आहे. महाविद्यालयातील विविध विभागातुन प्लेसमेंटकरीता समन्वय साधणारे प्रा. संग्राम दांडगे, प्रा. रवि हिरुळकर, प्रा. स्मित ठाकुर, प्रा. अनूप बुरंगे, प्रा. आनंद चौधरी, प्रा. ऋचा कोल्हेकर, डॉ. निनाद गावंडे, प्रा. नूपुर यावले, प्रा. नीलेश वाढे आदिंसह सर्व विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विदर्भ यूथ वेलफेयर समाज कल्याण संस्थाअध्यक्ष डॉ. नितीन धांडे ,उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारी सदस्य शंकर काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिनी देशमुख, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पूनम चौधरी तथा प्राचार्य डॉ. अमोल बोडखेंव्दारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

Central Library PRMIT & R., Badnera